# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०५/२०२४ (सोमवार) दुपार**

---

## पोलीस स्टेशन उमरेड येथे अवैध रेती वाहतुक करणारे टिप्पर जप्त ८ आरोपीतांवर गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत दिनांक १३/०५/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वा. सुमारास टिप्परव्दारे अवैध रेती वाहतुक केली जात आहे. अशा मिळालेल्या गोपनिय माहीती वरुन पोलीस स्टेशन उमरेडचे पथकाने पोस्टे हददीत भिवापूर रोडवर नाकाबंदी लावुन अवैध वाहतुक करणारे एकूण ४ टिप्पर थांबवुन तपासले असता १) टिप्पर क्र. MH 36 F 5800 किंमती २०,००,०००/—रू. व त्यामध्ये ५ ब्रास विना रॉयल्टी भरलेली रेती किं. २५,०००/—रू. २) टिप्पर क्र. MH 36 AA 2296 किं. २०,००,०००/—रू. व त्यामध्ये ५ ब्रास विना रॉयल्टी भरलेली रेती किं. २५,०००/—रू. ३) टिप्पर क्र. MH 40 AK 7301 किं. २०,००,०००/—रू. व त्यामध्ये ५ ब्रास विना रॉयल्टी भरलेली रेती किं. २५,०००/—रू. ४) टिप्पर क्र. MH 27 X 7610 किं. २०,००,०००/—रू. व त्यामध्ये ५ ब्रास विना रॉयल्टी भरलेली रेती किं. २५,०००/—रू. असे रेतीसह टिप्पर ताब्यात घेवुन एकूण ८१,००,०००/— रु चा मुददेमाल जप्त केला आहे.

त्यावरुन १) टिप्पर क्र. MH 36 F 5800 चालक रुपेश रंजन गायकवाड वय १९ वर्ष रा. खैरी दिवान पोस्ट आसगाव ता. पवनी जि. भंडारा व मालक अनिकेत रामेश्वर पंचभाई वय २१ वर्ष रा. वलनी त. पवनी जि. भंडारा, २) टिप्पर क्र. MH 36 AA 2296 चा चालक सतिश बाळकृष्ण बोरीकर वय २६ वर्ष रा. सोनेगाव पोस्ट विरली ता. पवनी जि. भंडारा व मालक चंदु अनिल तिघरे वय २७ वर्ष रा. पवनी जि. भंडारा, ३) टिप्पर क्र. MH 40 AK 7301 चा चालक कार्तिक रमेश धनजुढे वय २६ वर्ष रा. सिरसाळा त. पवनी जि. भंडारा व मालक भुदेव गंगाधर बावनकर वय ४० वर्ष रा. पवनी जि. भंडारा, ४) टिप्पर क्र. MH 27 X 7610 चा चालक प्रशांत इसांबर गिरडकर वय २४ वर्ष रा. ब्राम्हणी त. पवनी जि. भंडारा व मालक प्रफुल देविदास भोले वय ३५ वर्ष रा. बेसुर त. भिवापूर जि. नागपूर अशा एकूण ८ आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९ भादवी सहकलम ४८(७), ४८(८) महा जमीन महसुल अधिनियम १९६६, सहकलम ४, २१ खाण आणि खनिज अधिनियम १९५७, सहकलम ३ सार्वजनीक मालमत्ताचे नुकसान प्रतिबंध अधिनियम १९८४ अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. श्री राजा पवार उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग उमरेड यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे ठाणेदार पोस्टे उमरेड, पोहवा राधेशाम कांबळे, पोना पंकज बटटे, पोकों रोशन सहारे, तुषार गजभिये यांनी केली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर